दिनांक :   .   .२०१९

प्रति,

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : सातत्याने होत असलेल्या हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या, सतत मिळणार्‍या धमक्या यांमागील षड्यंत्राचा शोध घेणे, तसेच हिंदुत्वनिष्ठांच्या हत्येचा तपास 'राष्ट्रीय तपास यंत्रणे'कडे सोपवणे यांविषयी....**

महोदय,

गेल्या काही मासांत देशभरात विविध हिंदुत्ववादी संघटनांचे नेते आणि कार्यकर्ते यांच्या हत्या करणे; त्यांच्यावर प्राणघातक आक्रमण करणे; त्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य करणे; त्यांना वेचून आणि पाळत ठेवून पद्धतशीरपणे ठार मारणे अशा घटनांत लक्षणीय वाढ झाली आहे. १८ ऑक्टोबर या दिवशी उत्तरप्रदेशमधील हिंदु महासभेचे तथा हिंदु समाज पक्षाचे अध्यक्ष कमलेश तिवारी यांची भरदिवसा त्यांच्या कार्यालयात घुसून हत्या करण्यात आली. तिवारी यांच्या हत्या प्रकरणात विशेष तपास पथकाने २ इमाम, तर गुजरात येथून हत्येचा मुख्य सूत्रधार रशीद पठाण, मोहसीन शेख आणि फैजान, तसेच हत्या करणारे मौलाना अनवारुल हक अन् मुफ्ती नईम काझी यांना अटक केली. या हत्येचा कट दुबईत रचण्यात आला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याचा अर्थ हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील षड्यंत्र आहे, हे स्पष्ट होते. भारतासारख्या लोकशाही देशात 'एका हिंदुत्वनिष्ठाची हत्या करणार्‍याचा जाहीर फतवा काढला जाऊन त्यानुसार प्रत्यक्ष कृतीही केली गेली', हे अतिशय गंभीर आहे.

*** तरी या संदर्भात आम्ही काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो ...**

१. उत्तरप्रदेशमध्येच ८ ऑक्टोबरला देवबंद येथे भाजप नेते यशपाल चौधरी, १० ऑक्टोबरला बस्ती येथील भाजप नेता कबीर तिवारी, १२ ऑक्टोबरला सहारणपूर येथील भाजप नगरसेवक धारा सिंह, १८ ऑक्टोबरला हिंदुत्वनिष्ठ अधिवक्ता मुकेश शर्मा आणि कमलेश तिवारी अशा ५ हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या केवळ उत्तरप्रदेशमध्येच आणि एकाच मासांत होणे, हे अतिशय चिंताजनक आहे.

२. नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, रा.स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार विराट कोहली यांच्यासह देशभरातील महत्त्वाच्या व्यक्तींवर आतंकवाद्यांनी आक्रमण करण्याचा कट रचला आहे. हा कट 'ऑल इंडिया लष्कर-ए-तोयबा'च्या कोझीकोड (केरळ) येथे झालेल्या उच्चाधिकार समितीने रचला आहे. यासंबंधी काही महत्त्वाची कागदपत्रे आणि नावांची सूची राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेच्या (एन्आयएच्या) हाती लागली आहेत.

३. साध्वी प्राची, अखिल भारतीय हिंदु महासभेचे उत्तरप्रदेश अध्यक्ष श्री. राजीव कुमार, उत्तरप्रदेशमधील नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री. अमित जानी, मध्यप्रदेशातील हिंदुत्वनिष्ठ श्री. उपदेश राणा, प्रसिद्ध हिंदुत्वनिष्ठ वक्ते श्री. पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ आदी काही हिंदुत्वनिष्ठांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात येत आहेत.

४. 'सुदर्शन न्यूज वाहिनी'चे मुख्य संपादक आणि प्रखर हिंदुत्वनिष्ठ श्री. सुरेश चव्हाणके यांना अबूल फैजल नावाच्या धर्मांधाने एक व्हिडिओ प्रसारित करून जीवे मारण्याची धमकी दिली.

हा सर्व प्रकार एका व्यापक कटाचा भाग वाटतो.

५. मध्यप्रदेशमध्ये जानेवारी २०१९ मध्ये केवळ दोन दिवसांत ४ हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या करण्यात आल्या होत्या. यांच्या सूत्रधारांपर्यंत काँग्रेस शासन पोहोचू शकले नाही. या हत्यांमध्ये गुन्हेगार कोण आहेत ?, हे विविध

अन्वेषण यंत्रणांना स्पष्ट असूनही संबंधित राज्य शासनाकडून या प्रकरणी विशेष कारवाई होतांना दिसत नाही. या हत्या रोखण्यासाठी त्या त्या राज्यातील पोलीस तपासात दिरंगाई करत असल्याचेही दिसून येत आहे. यामुळे आक्रमणकर्त्यांचे मनोबल वाढत आहे. मध्यप्रदेशमध्ये सत्तांतर झाल्यावर लगेच अशाप्रकारे हत्या होतात, यातून 'हिंदुत्ववादी विचारसरणी बाळगणाऱ्यांना लक्ष्य केले जात आहे', हेच दिसून येते. असे असले तरी पोलीस या हत्यांमागे वरवर तपास करून वैयक्तिक हेवेदावे असल्याचे दाखवतात आणि या हत्यांचा तपास दडपण्याचा प्रयत्न करतात.

६. केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, बंगाल, जम्मू-कश्मीर आदी राज्यांत होत असलेल्या हिंदु नेत्यांच्या हत्या एका व्यापक सुनियोजित कटाचा भाग असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.

*** या संदर्भात आमच्या पुढील मागण्या आहेत ...**

१. कमलेश तिवारी यांसह अन्य हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या करणाऱ्यांना तात्काळ कठोर शासन व्हावे.

२. हा सर्व एका व्यापक कटाचा भाग असण्याची शक्यता लक्षात घेऊन हिंदुत्वनिष्ठांच्या वाढत्या हत्याकांडामागील षड्यंत्राचा शोध घेण्यात यावा. या प्रकरणांचा तपास 'राष्ट्रीय तपास यंत्रणे'कडे (एन्.आय.ए.कडे) द्यावा.

३. तपासाची कालमर्यादा निश्‍चित करून आक्रमणकर्त्यांची पाळेमुळे खणून काढावीत.

४. ज्या हिंदुत्वनिष्ठांवर आक्रमण होण्याची शक्यता वाटते, अशांची सूची बनवून त्या सर्व हिंदुत्वनिष्ठ नेत्यांना राज्यात आणि राज्याबाहेर तात्काळ सुरक्षा पुरवण्याचे आदेश केंद्र शासनाने द्यावेत.

आपला नम्र,

संपर्क :